**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
**दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७** **Email - ccrcs.general@gmail.com**


जा.क्र.१५-सआ/सहकार पुरस्कार/सन२३-२४/२०२५/१४५३ दि :-१३/६/२०२५

**प्रति,**

१. **विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था सर्व (प्रशासन/लेखापरीक्षण).**
२. **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).**
३. **जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (सर्व).**

**विषय- सन २०२३-२४ मधील सहकार पुरस्कार वितरण.**

**संदर्भ-** कार्यासन अधिकारी १८-स यांचेकडील क्र.संकिर्ण ०५२५/प्रक्र.९०/१८-स दि.३/६/२०२५ चे पत्र. (सोबत प्रत)

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रान्वये सहकार पुरस्कार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वितरीत करावयाच्या पुरस्कारांबाबत पात्र संस्थांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सहकार पुरस्कार संदर्भात शासन निर्णयामध्ये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.) या सूचनांनुसार सहकार पुरस्कारासाठी सहकारी संस्थांचे प्रस्ताव मागविणे, छाननी करणे, मुख्यालयास सादर करणे, मुख्यालय स्तरावरील समितीने शिफारसपात्र संस्थांची यादी तयार करुन शासन स्तरावरील समितीस सादर करणे या बाबतचा कालबध्द कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कार्यवाहीचा दिनांक/ कालावधी | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे कार्यालय | प्रस्तावांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | दि.१/७/२०२५ | सहकार पुरस्कार सन २०२३-२४ कार्यक्रमास प्रसिध्दी देणे. | जिल्हा उपनिबंधक (सर्व) | - |
| २ | दि.२/७/२०२५ ते १८/७/२०२५ | सहकारी संस्थांनी आपले पुरस्कारासाठीचे प्रस्ताव ज्या तालुक्यात त्यांचे मुख्यालय आहे त्या तालुक्याचे तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांचेकडे सादर करणे.<br>१) जिल्हा स्तरावर गट नियम/प्रकार नियम किमान १० संस्थाचे प्रस्ताव आवश्यक<br>२) संस्थेचा प्रस्ताव दाखल होत असतांना आवश्यक ती सर्व कागद पत्रे सोबत असल्याची खात्री करावी. अपूर्ण कागदपत्रे पूर्ण करुन घेणे बाबत संबधितांना मार्गदर्शन करावे. | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक | - |
| ३ | दि.२१/७/२०२५ ते दि.३०/७/२०२५ | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांनी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे छाननी करुन प्रस्ताव सादर करणे | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक | सहा.निबं. यांचे कडून प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव |

| अ. क्र. | कार्यवाहीचा दिनांक/ कालावधी | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे कार्यालय | प्रस्तावांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ४ | ३१/७/२०२५ ते ८/८/२०२५ | जिल्हा उपनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांचेकडे सादर करणे | जिल्हा उपनिबंधक | १:४ |
| ५ | दि.११/८/२०२५ ते २५/८/२०२५ | विभागीय सहनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे | विभागीय सहनिबंधक | १:३ |
| ६ | दि.२६/८/२०२५ ते १२/९/२०२५ | सहकार आयुक्त स्तरावरील समितीने प्रस्ताव छाननी करुन शासनाकडे पाठविणे | सहकार आयुक्त | १:२ |
| ७ | दि.१५/९/२०२५ ते २६/९/२०२५ | शासन स्तरावरील मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पुरस्कार प्राप्त संस्थांची अंतिम निवड करणे | - | - |
| ८ | शासन मान्यतेने दिनांक घेणे. | पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन व पुरस्कारांचे वाटप | - | - |

या कामासाठी आपल्या कार्यालयातील एका जबाबदार अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी. नोडल अधिकाऱ्यांनी कार्यालय प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव मागविणे व प्रस्ताव छाननी करुन विहित मुदतीत वरिष्ठ कार्यालयास सादर करण्याचे काम करावे.

प्रस्तावांची छाननी करुन शिफारस करण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भानुसार व त्याअनुषंगाने निश्चित केलेले भाग -अ, भाग-ब व भाग-क प्रमाणे छाननी निकष व मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज करावे व कोणतेही विवाद उपस्थित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्व प्रस्ताव कार्यालय प्रमुखाचे स्वाक्षरीने सादर करावेत. जेणे करुन शिफारस प्राप्त संस्थेच्या प्रस्तावाची संपुर्ण जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

Tawar

**(दिपक तावरे भा.प्र.से)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत- कार्यासन अधिकारी- १८-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई-४०० ०३२.**

**प्रत उचित कार्यवाहीस्तव-**

१. अपर निबंधक, (प्रशासन), (पतसंस्था) (तपासणी व निवडणुका),(लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे.
२. कार्यासन अधिकारी (सर्व) मुख्यालय पुणे.
३. खाजगी सचिव कक्ष, मुख्यालय पुणे.

मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**

**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००० ३२**
**दुरध्वनी क्रमांक- ०२२ २२८८५९८४ ई मेल : desk१८c.cmtd@mah.gov.in**

**क्रमांक:- संकिर्ण ०५२५/ प्र.क्र.९०/१८-स** **दिनांक-०३.०६.२०२५**

**प्रति,**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**विषय :- सन २०२३-२४ मधील सहकार पुरस्कार वितरण.**
**संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. सीसीआर-१४०८/प्र.क्र.४६२/२-स, दि. २०.०४.२०१२.**
**२) शासन निर्णय क्र. सीसीआर-१४०८/प्र.क्र.४६२/२-स, दि. ११.१०.२०१३**

**महोदय,**

सहकार क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना त्यांच्या सहकार क्षेत्रामधील योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे.

२. दरम्यान सहकार पुरस्कारासाठी पात्र संस्थांची निवड करण्याची कार्यपद्धती, निकष इ. मध्ये बदल करुन सद्यस्थितीतील शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये सुधारणा करणेबाबत तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांनी दिलेल्या निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीने प्रस्ताव सहकार आयुक्तांना सादर केला होता.

३. सदर प्रस्तावाबाबत मा. मंत्री (सहकार) यांचेकडे दिनांक ०५.०२.२०२५ रोजी सादरीकरण करण्यात आले असता, मंत्री महोदयांनी सदर प्रस्तावामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि मा. मंत्री (सहकार) यांच्या निर्देशानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्यास काही कालावधी लागु शकतो ही बाब विचारात घेता, सद्यस्थितीत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वितरीत करावयाच्या पुरस्कारांबाबत पात्र संस्थांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करावा, ही विनंती.

**आपला,**

(राहूल शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन